अल्बर्ट आईनस्टाईनपर्यंत प्रत्येकजण जाणत होता की (प्रत्येकाला माहित होते की), सर्व प्रश्न सोडविण्याची किल्ली सर्व सृजनशीलता /निर्मितीक्षमता प्रत्येकाच्या वैयक्तिक कल्पनेच्या विश्वात असते.

स्त्रोत: **ऑन द ब्रिथ ऑफ द गॉडस्** लेखक **अेरियल टोमिओका**, कृतज्ञतापूर्वक आभार.

## "तुमची मुले"



"तुमची मुले ही तुमची मुले नाहीत!
ते जीवनाच्या उत्कट आशेची/ अभिलाषेचीच स्वत:साठीची मुले आणि मुली आहेत.
ते तुमच्यातून येतात पण तुमच्यापासून नव्हे!
ते जरी तुमच्याजवळ असले तरी ते तुमच्या मालकीचे नसतात!
तुम्ही त्यांना तुमचे प्रेम देऊ शकता पण तुमचे विचार नाही,
कारण त्यांना त्यांचे स्वत:चे विचार आहेत!
तुम्ही त्यांच्या शरिरात रहाल पण त्यांच्या आत्म्यात नाही!
कारण त्यांचे आत्मे उद्याच्या घरात रहात असतात!
तेथे तुम्ही कधीही जाऊ शकत नाही, तुमच्या स्वप्नातही नाही!
तुम्ही त्यांच्यासारखे होण्यासाठी झगडा/जोरदार प्रयत्न करा
पण त्यांना तुमच्यासारखे बनवण्याचा प्रयत्न करू नका!"

**खलील जिब्रान**


## पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटी, पुणे

**संत ज्ञानेश्वर पिरामिड ध्यान केंद्र,**

सूर्य अपार्टमेंट, कोहिनूर कॉलनी सहकारनगर नं. २, पुणे ४११००९

जोशी : ८२७५६९६६७८, हिमांगी : ९३७०५३८८६२, ओंकार : ९८२२६३३३६२,
डॉ. बलानी : ९८२२०६५९०६, रितू : ९८९०६४४२०१, करे : ९०११६६८६२९,
गानला : ९७६४७९८१९६, अंजली : ९०९६९३८१७१, तृप्ती : ९४२२५११९८१४,
क्षत्रिय : ९७६२५५९६८०, रेखा : ९८२२५६६५३६, तेजल : ९८९०५३९५०९



वाचा आणि सभासद व्हा! **ध्यान महाराष्ट्र** नवयुगाचे त्रै-मासिक मोबाईल नं. ८२७५६९६६७८


अेरियल टोमिओका

# मुले आध्यात्मिक अस्तित्व आहेत




"तुम्ही लहान मुलासारखे झाल्याशिवाय
तुम्ही देवाच्या राज्यात प्रवेश करू शकत नाही."

येशू ख्रिस्त

## पिरामिड स्पिरिच्युअल सोसायटीज् मूव्हमेंट, इंडिया

पिरामिड ध्यान जगत – २०१६ अहिंसा शाकाहार जगत – २०२०

www.pssmovement.org

अेरियल टोमिओका

## मुले आध्यात्मिक अस्तित्व आहेत.

मुले म्हणजे स्त्री आणि पुरूष यांच्या लैंगिक मीलनाचा भौतिक परिणाम आहे. पण ते तेवढेच नाहीत तर त्यापेक्षाही जास्त आहेत. ते आपल्या आध्यात्मिक जाणीवेची परिक्षा घेणारे आहेत. आपण जर सत्य शिकू शकलो आणि आपल्याकरता त्याचा उपयोग करू शकलो तर आपण मुलांना वाढविताना त्याचा उपयोग करू शकू.

जास्तीत जास्त वेळा पालक आपल्या आई वडिलांनी आपल्याला जसे वागवले तशी वागणूक त्यांच्या मुलांना देतात. ''वडिलांची पापे मुलांच्या नशिबी आली आहेत.'' या विधानामागे हेच सत्य आहे. बायबलच्या अर्थाने ते काही खरे ईश्वरी पवित्र प्रेम/सूड नाही. पण फक्त कारण आणि परिणामाचा आध्यात्मिक कायदा येथे काम करत असतो.

## ''कधीही चूक होत नाही''

कुटुंबातील आध्यात्मिक जाणीव त्यांच्याशी सूर जुळतील अशा आत्म्यांना आकर्षित करते. किंवा त्या समूहात राहून त्यांचा चांगल्या प्रकारे फायदा होऊ शकेल अशा आत्म्यांना खुणावते.
कोठे केव्हा आणि कोणाच्या पोटी एखाद्याचा जन्म होतो यात काहीही चूक होत नसते. आत्मा जेव्हा पृथ्वीवरील शरीर निवडतो तेव्हाच या सर्व कारणीभूत गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला जातो.

## ''मूल आध्यात्मिक अस्तित्व आहे.''

आई वडिलांना मनापासून प्रामाणिकपणे खूप मेहनत कष्ट घेऊन आपल्या पूर्वीच्या स्थितीवर मात करून त्यांचे स्वत:चे आणि त्यांच्या मुलांचे जीवन अधिक चांगले करता येणे शक्य आहे.

आपले मूल आध्यात्मिक अस्तित्व आहे , देव आहे हे आई वडिलांनी समजून घ्यायला हवे आणि स्वीकारायला हवे. ते पुरूषही नाही आणि स्त्री ही नाही. आपल्या स्वत:च्या पूर्णत्वासाठी आणि देवपणाचा अनुभव घेण्यासाठी व जाणीव विकसित करण्यासाठी, तिच्याशी बांधिलकी राखण्यासाठी लैंगिक फरकाच्या स्थितीतून फक्त जात आहेत. हे लक्षात आल्यावर **आई वडिलांनी स्वत:ला आधी प्रथम शिक्षक व नंतर काळजी घेणारे पालक आहोत हे मानले पाहिजे.**

आध्यात्मिक माहितीपेक्षा इतर गोष्टी आणि प्रसंगांनी मुलांचे आयुष्य व्यापून टाकणे आई बापांसाठी फार सोपे आहे. याचे कारण असे आहे की, आईवडिलांनी स्वत:च देवाबद्दल व आत्म्याबद्दल स्वत:ला न विचारलेल्या/स्वत:ला उत्तर न मिळालेल्या प्रश्नांची सोडवणूक केलेली नसते आणि त्यांच्या अपत्यांना शिकविण्याची त्यांची तयारी नसते.

## ''मानसिक व आध्यात्मिक जाणीव''

मूल या जगात येते तेव्हा त्याचे लक्ष बाहेरच्यापेक्षा आतमध्ये जास्त असते. कोणतेही प्रशिक्षण नसताना ते स्वभावत:च स्वर्गलोक व भौतिक पातळी यामध्ये पुढे मागे ये जा करत असते. हे आतल्या भागाचे ज्ञान त्याला मानसिक व आध्यात्मिक जाणीवेतून होत असते. नंतर हळुहळु या भूतलावरील गावंढळ नियमांशी ते मूल भौतिक ज्ञानेंद्रियामार्फत जुळवुन घेते.

मूलाला त्याच्या स्वत:च्या मनात जे चालले आहे ते खरे आणि मौल्यवान आहे असे शिकवून तुम्ही त्याच्यातील उच्च जाणीवेची त्याची जाणीव सुरक्षित राखू शकतात.

पृथ्वीवरील सर्व अपूर्व बुध्दिमान / प्रतिभाशाली व्यक्तींना कल्पना करण्याची ही देणगी/भेट मिळालेली असते. बिथोवन पासून